पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in

दिनांक १४/१०/२१

## निमंत्रीत युथ नॅशनल चॅम्पीयनशिप चॅम्पीयनशिप स्पर्धा २०२१ मध्ये वाशिम दालातील पोलीसांना एक सुवर्ण व एक रौप्य पदक.

दिनांक ०८/१०/२०२१ ते १०/१०/२१ या कालावधीत ४थी युथ निमंत्रीत नॅशनल चॅम्पीयनशिप अर्चरी (धर्नुविद्या) स्पर्धा गोवा राज्यातील मडगाव येथे आयोजित करण्यात आली होती. नमुद स्पर्धेमध्ये विवीध खेळप्रकारात देशाच्या विविध राज्यातुन जवजवळ एक हजार खेळाडुंनी आपला सहभाग नोंदविला होता. महाराष्ट्र पोलीस अर्चरी संघाने सुध्दा आपला सहभाग नोंदविला होता. महाराष्ट्र पोलीस अर्चरी संघात वाशिम जिल्हयाच्या महिला पोलीस कर्मचारी भाग्यश्री बल्लाळ ब.क्र. ११८८ आणि महिला पोलीस शिपाई रेखा लांडकर ब.नं १३८४ यांचा सहभाग होता. नेत्रदिपक कामगिरी करत कंम्पाउंड ५० मिटर धर्नुविद्या या खेळप्रकारात भाग्यश्री बल्लाळ हिने प्रथम क्रमांक मिळुवन सुवर्ण पदक पटकावले तर रेखा लांडकर हिने द्वितिय क्रमांक मिळवुन रौप्य पदक पटकावुन महाराष्ट्र पोलीस संघाचे, अमरावती परिक्षेत्राचे तसेच वाशिम पोलीस दलाचे नाव लौकिक केले आहे. या दान्ही खेळाडुंनी याआधी २०१७–१८ सालच्या मनिपुर ईम्फाळ येथे आयोजित अखिल भारतीय धर्नुविद्या स्पर्धेत ०१ सुवर्ण व ०२ कास्य, २०१८–१९ सालच्या रांची झारखंड येथे झालेल्या अखिल भारतीय धर्नुविद्या स्पर्धेत ०२ सुवर्ण व ०१ कास्य, २०१९ सालच्या पश्चिम बंगाल सिलीगुडी येथे झालेल्या अखिल भारतीय धर्नुविद्या स्पर्धेत ०२ सुवर्ण व ०१ कास्य अशा पदकांची कमाई करून वाशिम जिल्हा पोलीस दलाचे नाव लौकीक केले आहे.

या कामगिरी बददल दोन्ही खेळाडुंना वाशिम जिल्हयाचे पालकमंत्री तथा गृह राज्य मंत्री ना. शंभुराज देसाई व मा. चंद्रकिशोर मिना, पोलीस उपमहानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी शुभेच्छा दिल्या असुन मा. अनुप कुमार, अपर पोलीस महासंचालक(प्रशासन), मा. रविंद्र सेनगावकर, विशेष पोलीस महानिरीक्षक, मा. बच्चन सिंग पोलीस अधीक्षक वाशिम, मा. गोरख भामरे अपर पोलीस अधीक्षक वाशिम, मा. जुनेद खान सहायक किडा अधिकारी महाराष्ट्र राज्य, मुंबई, मा. डी.सी. खंडेराव प्र. पोउपअधी. (गृह) वाशिम, मांगीलाल पवार राखीव पोलीस निरीक्षक पो.मु. वाशिम, सहा.प्रशिक्षक हवालदार सुरेश शिंदे, वाशिम पोलीस किडा प्रशिक्षक आशिष जयस्वाल यांनी खेळाडुंचा सत्कार करून भविष्यात उज्ज्वल कामगिरी करीता शुभेच्छा दिल्या.

मा. पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह यांनी वाशिम जिल्हा पोलीस दलाने भविष्यात सुध्दा अशाच प्रकारची भरीव कामगिरी करुन वाशिम जिल्हा पोलीस दलाचे नाव उंचाविण्याकरीता प्रोत्साहन दिले आहे.

पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा वाशिम


पोलीस
BACHCHAN SINGH
NIKE